| CNR No.MHWR040010542024 | दाखल तारिख | १६/०७/२०२४ |
|---|---|---|
| | नोंदणी तारिख | १६/०७/२०२४ |
| | निकाल तारिख | ११/०५/२०२६ |
| | कालावधी | ०१ वर्षे, ०९ म, २५ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः ११/०५/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपीतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि.२६/०८/२०२३ रोजी वेळ २२.४५ ते २३.१५ वाजताच्या दरम्यान पारधी बेडा, मौजा केळझर, ता. सेलू, जिल्हा-वर्धा येथे आरोपीच्या घरझडतीतून अवैधरित्या व विना परवाना दोन प्लास्टीक ड्रममध्ये अंदाजे प्रत्येकी २५० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन व दोन प्लास्टीक ड्रम जवळ बाळगतांना मिळून आली, म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(एफ) अंतर्गत गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार शरद भिवाजी चव्हाण यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दा क्र. १ करीता** :

४. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी, आरोपी ही स्वत:च्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी तिच्या ताब्यात अवैधरित्या व विना परवाना कच्चा मोहा रसायन सडवा व इतर भट्टी साहित्य जवळ बाळगतांना मिळून आली, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने पंच साक्षीदार शरद भिवाजी चव्हाण यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे तपासले. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, पोलीसांनी त्यांना दिनांक २६/०८/२०२३ रोजी पंचनामा करण्याकरिता पंच म्हणून कुठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदावर सही घेतली. त्यांना सदरचा मौकाजप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली, परंतू त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दिनांक २६/०८/२०२३ रोजी पोलिसांनी त्यांना पारधी बेडा, केळझर, ता.सेलू व जि.वर्धा येथे पंच म्हणून बोलविले होते. तसेच त्यांच्या समक्ष आरोपीच्या घरझडतीतून २५०

लिटर लिटर कच्चा मोहा रसायन सडवा जप्त केली व त्याबाबत मौकाजप्ती पंचनामा तयार केला व त्यावर त्यांनी वाचून व समजून सही केली. जप्त मालापैकी एक १८० मि.लि.ची शिशीत कच्चा मोहा रसायन सडवाने भरलेली सी.ए. परिक्षणाकरिता नमुना काढून घेतली व त्यावर त्यांची, दुसरा पंच व पोलीसांच्या सहीचे लाखेने डबल सील केले.

६. प्रस्तूत प्रकरणात अभियोग पक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार तपासले नाही. अभियोग पक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता मौकाजप्ती पंच साक्षीदार तपासले परंतु त्यांनी मौकाजप्ती पंचनामा बाबत काही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत घटनास्थळावरुन आरोपीच्या घरझडतीतून अवैधरित्या व विना परवाना दोन प्लास्टीक ड्रममध्ये अंदाजे प्रत्येकी २५० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन व दोन प्लास्टीक ड्रम जप्त केले, ही बाब सिध्द झाली नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक तज्ञाचा अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आला नाही व त्या अनुषंगाने कुठलाही पुरावा उपलब्ध केला नाही.

७. त्यामुळे संचीकेवरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीविरूध्दचा महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(एफ) चा गुन्हा आरोपीने केल्याचे सिध्द केलेले नाही या निष्कर्षावर मी पोहोचले आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :**

८. अपराध क्रमांक ६०७/२०२३ मधील जप्त मुद्देमाल जागीच पंचासमक्ष नाश केल्यामुळे त्याबाबत कोणताही आदेश पारीत करण्यात येत नाही. वरील मुद्यांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी ही ठेवलेल्या आरोपामधुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**सं.फौ.ख.क्र. ७६६/२०२४**
**शासन .वि. शोभा भोसले**
**नि.क्र. ०६ पुढे**
**[CNR No. MHWR040010542024]**

# आदेश

१) आरोपी **शोभा मित्रा भोसले** हिला महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(एफ) अन्वयेच्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) अपराध क्रमांक ६०७/२०२३ मध्ये जमा करण्यात आलेली सुरक्षा राशी रक्कम आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४) आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ] प्रमाणे रु.१५,०००/- किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.11 16:25:12 +0530

(एस.आर.सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सेलू, जिल्हा-वर्धा

**दिनांक** : ११/०५/२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)